पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर - ४१३२५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur - 413 255 (Maharashtra)
☏: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in
संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in
विस्तारित क्रमांक : १३०
® Examination and Evaluation Section ®

Ref. No.: PAHSU/BOEE/ 2549

Date : 3 NOV 2023

प्रति,
**मा.प्राचार्य,**

१. डी.बी.एफ. दयानंद कॉलेज आर्टस अॅन्ड सायन्स, सोलापूर
२. श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी
३. उमा महाविद्यालय, पंढरपूर

**विषय :- ऑक्टोबर / नोव्हेंबर २०२३ च्या परीक्षेतील मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राच्या कार्यप्रणाली व नियमावलीबाबत.....**
**संदर्भ :- PAHSUS/EXAM/२०२३/२४१५ दि. २१/१०/२०२३**

महोदय/महोदया,

ऑक्टोबर / नोव्हेंबर २०२३ च्या पारंपारिक अभ्यासक्रमाच्या व्दितीय व तृतीय वर्षाचे मूल्यमापन हे ऑफ लाईन पध्दतीने होणार आहे. त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयाची मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार आपणास कळविण्यात आलेले आहे.

त्याअनुंषगाने ऑफ लाईन मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रासाठी एक कार्यपध्दती व नियमावली तयार करण्यात आली असून त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

डॉ. एम.एस. रोकडे
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी**
१. मा. कुलगरु कार्यालय
२. मा. कुलसचिव कार्यालय
३. परीक्षा विभागाकडील सर्व संबंधित विभाग व अधिकारी - पुढील कार्यवाहीसाठी

# पारंपारिक अभ्यासक्रमाच्या व्दितीय व तृतीय वर्षाचे ऑफलाईन मूल्यमापनासाठी मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकरिता कार्यपध्दती व नियमावली

१. ऑक्टोबर / नोव्हेंबर २०२३ च्या परीक्षेसाठी खालीलप्रमाणे मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र निश्चिती करण्यात येत आहे.

   १. दयानंद कॉलेज आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर
   २. श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी
   ३. उमा महाविद्यालय, पंढरपूर

२. या केंद्रांकडे खाली नमुद केलेल्या परीक्षा केंद्राकडून उत्तरपत्रिका स्विकारण्यात येतील.

दयानंद कॉलेज आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर --

सोलापूर शहर, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट तालुका, मोहोळ तालुका सर्व परीक्षा केंद्रे

श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी ---

बार्शी तालुका, करमाळा तालुका, माढा तालुका सर्व परीक्षा केंद्रे

उमा महाविद्यालय, पंढरपूर

पंढरपूर तालुका, माळशिरस तालुका, मंगळवेढा तालुका, सांगोला तालुका सर्व परीक्षा केंद्रे

३. तसेच दयानंद कॉलेज आर्टस अंन्ड सायन्स, सोलापूर या मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर निकालाच्या दृष्टीने स्कॅनिंग होणार असल्याने सर्व मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडील उत्तरपत्रिका परीक्षण झाल्यानंतर दयानंद कॉलेज आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडे जमा करावयाच्या आहेत.

४. कॉपी केसेस मध्यवर्ती मुल्यमापन केंद्राकडे स्वीकारु नये. त्या विद्यापीठाकडे स्विकारण्यात येतील.

५. उत्तरपत्रिका कनिष्ठ पर्यवेक्षकांच्या अहवालानुसार बरोबर असल्याची खात्री करुन स्विकारण्यात याव्यात.

६. तसेच उत्तरपत्रकेवर बारकोंडीग स्टीकर असल्याची व इतर आवश्यक माहिती पुर्ण भरल्याची खात्री करावी.

७. बारकोर्डीग स्टीकर नसलेले व अपुर्ण माहिती असलेली उत्तरपत्रिका स्विकारु नये.

८. उत्तरपत्रिकेसोबत दोन प्रतित कनिष्ठ पर्यवेक्षकांचा अहवाल घेण्यात यावा. त्यापैकी एक प्रत मुल्यमापन केंद्राकडे ठेवावी व एक प्रत विद्यापीठाकडे पाठविण्यात यावी.

९. कनिष्ठ पर्यवेक्षकांच्या अहवालामध्ये Answer Booklet Number असणे आवश्यक आहे.

१०. मध्यवर्ती मुल्यमापन केंद्राकडे परीक्षा केंद्राकडून उत्तर पत्रिका प्राप्त झाल्यानंतर प्रथम अभ्यासक्रमनिहाय, एसएलआर निहाय, तारिख व विषयवार स्वतंत्र गठ्ठे करण्यात यावे.

११. मध्यवर्ती मुल्यमापन केंद्राकडे रोजच्या रोज जमा होणा-या उत्तरपत्रिकेचा अहवाल दुस-या दिवशी सकाळी ११.०० पर्यंत cap@sus.ac.in या ईमेलवर एसएलआर निहाय पाठविण्यात यावा.

१२. प्रत्येक परीक्षा केंद्राकडून रोजच्या रोज उत्तरपत्रिका येत असल्याची खात्री करावी. एखादे दिवशी एखादे केंद्राकडून उत्तरपत्रिका न आल्यास संबंधती परीक्षा केंद्रास दुरध्वनीव्दारे उत्तरपत्रिका पोहच करण्याबाबत कळविण्यात यावे.

१३. कनिष्ठ पर्यवेक्षकांच्या अहवालानुसार गैरहजर असणा-या विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक Excel Sheet मध्ये एसएलआर निहाय Entry करुन cap@sus.ac.in या ईमेलवर पाठविण्यात यावे.

१४. मध्यवर्ती केंद्राकडे अभ्यासक्रम निहाय गठ्ठे केल्यानंतर, एसएलआर निहाय सदर उत्तरपरित्रकेचा PART-II फाडण्यात यावा व तो मध्यवर्ती मुल्यमापन केंद्राकडे सुरक्षीत ठेवण्यात यावा.

१५. PART - II फाडल्यानंतर विषयनिहाय म्हणजे एसएलआर निहाय एकत्र करुन ८० उत्तरपरित्रकांचा एक याप्रमाणे गठ्ठे करावेत.

१६. विविध विषयांच्या पॅनलची यादी मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रास विद्यापीठामार्फत पाठविण्यात येईल. त्यानुसार मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र संबंधित शिक्षकांना मूल्यमापन आदेश पारीत करतील.

१७. पॅनल संदर्भात कांही शंका किंवा अडचणी असल्यास विद्यापीठाशी संपर्क करावा किंवा संबंधित विषयाच्या अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांचे मार्गदर्शन घेवून पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

१८. विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या पॅनेल व्यतिरिक्त उत्तरपत्रिका लवकर तपासणी करण्याच्या दृष्टीने जास्तीच्या परीक्षकांची आवश्यता असल्यास संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करावी.

१९. उत्तरपत्रिका संबंधित परीक्षकांना तपासण्यासाठी देतेवेळी त्यांची विषयनिहाय नोंद उत्तरपत्रिका देवघेव नोंदवहीमध्ये परीक्षकांनी नोंद करुन स्वाक्षरी करावी. तसेच उत्तरपत्रिका तपासणी पूर्ण झालेनंतर त्यांची जमा नोंद उत्तरपत्रिका देव-घेव नोंदवहीमध्ये करुन परीक्षक व जमा करुन घेणा-या संचालकांनी स्वाक्षरी करावी.

२०. तसेच संबंधित परीक्षकांनी आपली उपस्थिती नोंदवहीमध्ये नोंद करुन सही करावयाची आहे.

२१. उत्तरपत्रिका तपासणीसाठी देताना त्याबरोबर संबंधित विषयाची प्रश्नपत्रिका व उत्तरतालिका देण्यात यावी.

२२. प्रश्नपत्रिका व उत्तरतालिका विद्यापीठामार्फत संबंधीत परीक्षा संपल्यानंतर दुस-या दिवशी ई-मेलव्दारे तिन्ही मुल्यमापन केंद्राकडे पाठविण्यात येईल.

२३. परीक्षक यांनी उत्तरपत्रिका तपासून प्रश्ननिहाय गुण उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावरील रकान्यात नोंदविले आहेत का ते पहावे. तेथे स्वाक्षरी केली आहे का ते पाहणे व तशा सूचना द्याव्यात.

२४. परीक्षण झालेल्या उत्तरपत्रिकातील विषय निहाय उत्तरपत्रिकेत परीक्षकांनी दिलेले प्रश्न निहाय गुण, उत्तरपत्रिकेतील सर्व प्रश्न तपासून गुण दिलेले आहेत काय, आतील पानावरील गुणाची प्रश्ननिहाय गुणांची बेरीज, प्रश्ननिहाय गुण मुखपृष्ठावर बरोबर घेतले आहे काय? इ. छाननी करणेचे आहे. तसेच काही दुरूस्ती असल्यास परीक्षक यांचेकडून तेथेच दुरूस्त करून घ्यावी व त्या दुरूस्तीच्या ठिकाणी त्यांची तारखेसह स्वाक्षरी घ्यावी.

२५. परीक्षण पुर्ण झाल्यानंतर केंद्राकडील परीक्षण झालेल्या उत्तरपत्रिका पुन्हा सीलबंद करुन दयानंद कॉलेज आर्टस अॅन्ड सायन्स, सोलापूर या मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर स्कॅनिंग अणि निकाल प्रक्रियेसाठी पाठविण्यात यावेत.

२६. मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडून परीक्षण करुन आलेल्या उत्तरपत्रिका स्कॅनिंगसाठी नियुक्त केलेल्या गोपनीय फर्मना पुढील कार्यवाहीसाठी देण्यात यावी व त्यांच्याकडून निकालाची पुढील प्रक्रिया करुन घेण्यात यावी.

२७. प्रत्येक विषयाच्या उत्तरपत्रिका संबंधीत विषयाची परीक्षा संपलेपासून १५ दिवसापर्यंत निकाल लावण्याची कार्यवाही करावी या संदर्भात कांही अडचणी असल्यास तसा अहवाल विद्यापीठाकडे सादर करावा म्हणजे वेळेत निकाल लावण्यासाठी योग्य नियोजन करण्यात येईल.

२८. मूल्यमापन करुन घेतलेनंतर विद्यापीठ नियमानुसार मॉडरेशन करुन घेण्यात यावे.